क्रमांक : ११५२८ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ३ जून, २०२२

**संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. हिंभाप १०८०/१३१-वीस, दिनांक २५ मे, १९८१.**
**२) शासन परि.क्र. मभाप १०९२/१०४५/प्र.क्र. ९८/२०, दिनांक ३ सप्टेंबर, १९९२.**

## :: परिपत्रक ::

या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, संदर्भाधिन शासन निर्णयान्वये माध्यमिक शालांत परीक्षा, मराठी व हिंदी हा विषय घेवून उत्तीर्ण झालेल्या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना एतदर्थ मंडळाच्या मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा तसेच हिंदीच्या निम्न व उच्चश्रेणी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येते. तसेच ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी माध्यमिक शालांत परीक्षा, मराठी व हिंदी हा विषय घेवून उत्तीर्ण झालेले नाहीत त्यांना एतदर्थ मंडळाची अनुक्रमे मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असून त्याबाबत सेवापुस्तकात नोंद असणे अनिवार्य आहे. तथापि, या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी केली असता बहुतांश अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात याबाबत नोंद असल्याचे आढळून येत नाही.

त्यानुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी माध्यमिक शालांत परीक्षा, मराठी व हिंदी विषय घेऊन उत्तीर्ण असल्याचे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र दिनांक २० जून, २०२२ रोजीपर्यंत कार्यालयात सादर करावे जेणे करुन त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात येईल तसेच जे अधिकारी/कर्मचारी माध्यमिक शालांत परीक्षा, मराठी व हिंदी हा विषय घेवून उत्तीर्ण झालेले नाहीत त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण होऊन त्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयात सादर करावे.

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी
३) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी सदरहू परिपत्रक या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत आस्थापना कक्षास परिपत्रक निर्गमित झाल्याच्या तारखेपासून आठ दिवसात कळवावे.
४) निवडनस्ती.